Exh. 9/C

Digitally signed by ARCHANA MANOJ GAIKWAD Date: 2026.02.27 16:55:09 +0530

R.& R.

रे.क.नं-२७ /२०२६

**मे. ३रे सह-दिवाणी न्यायाधीशसो क. स्तर, इचलकरंजी.**
**यांचे कोर्टात ......**

सौ.सुजाता रामचंद्र कुराडे वगैरे ३ — वादी

विरुद्ध.

कोणीही नाही — प्रतिवादी

**सी.पी.सी ऑ- १८ रुल- ४ अन्वये**
**वादीचे जबाबाचे शपथपत्र-**

मी यातील वादी नं-१ सौ. सुजाता रामचंद्र कुराडे व.व-४७ धंदा- घरकाम रा-बिरदेव नगर, रेंदाळ. ता-हातकणंगले जि-कोल्हापुर माझेकरीता व वादी नं-२ ते ४ यांचेकरीता देवाचे शपथेवर कथन करते की,

१) माझे पती व वादी नं-२ ते ४ यांचे वडील श्री.रामचंद्र राजाराम कुराडे हे ०१/०२/२०१८ इ. रोजी राहते घरातुन कोणास काहीही न सांगता निघून गेलेले आहेत. त्यावेळी मी, माझा भाऊ संजय राम संकपाळ रा-डफ़ळापुर ता-मिरज याला बोलावून घेवून माझे पती श्री.रामचंद्र राजाराम कुराडे यांचा जत, सांगली, मिरज या ठीकाणी जावून व मित्र मंडळी, पै-पाहूण्यांशी संपर्क साधून शोध घेतला परंतू माझे पती श्री.रामचंद्र राजाराम कुराडे हे आजतागायत मिळून आलेले नाहीत.

२) मी या कामी यादी नि-३ सोबत अ.क्र-२ ला आमचे कुटूंबाचे रेशन कार्ड व अ.क्र-३ ते ६ ला माझे व वादी क्र-२ते ४ यांचे आधार कार्ड याची व्हेरीफ़ाईड प्रत हजर केलेली आहे. सदर

27/2/26
Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.
Ichalkaranji

त्यातील संपूर्ण मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी देणेत यावी.

३) माझी मुले म्हणजेच वादी नं-२ ते ४ ही लहान असलेमुळे मी, माझा भाऊ संजय संकपाळ यांचे मदतीने श्री.ऱामचंद्र राजाराम कुराडे यांचा सर्व नातेवाईक, पै-पाहूने यांचेकडे शोध व माहीती घेतली मात्र ते मिळून न आलेने यातील मी, पोलिस ठाणे, हुपरी या ठीकाणी जावून ता-२१/०४/२०१८इ. रोजी श्री.ऱामचंद्र राजाराम कुराडे ही व्यक्ती मिसिंग असलेबाबत तसा वर्दी जबाब नोंदविलेला आहे. सदरच्या वर्दी जबाबाची स.शिक्का प्रत मी या कामी यादी नि- सोबत अ.क्र-१ ला हजर केलेली आहे. सदर वर्दी जबाबावर पोलिस ठाणे, हुपरी यांचा शिक्का असून त्यातील संपूर्ण मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी देणेत यावी.

४) माझे पती व वादी नं-२ ते ४ यांचे वडील श्री.ऱामचंद्र राजाराम कुराडे हे ०१/०२/२०१८ इ. रोजी पासून अध्याप कोणालाही दिसून आलेले नाहीत व त्यांचा आजतागायत कोठेही ठावठिकाणा लागलेला नाही. श्री.ऱामचंद्र राजाराम कुराडे यांनी ता-०१/०२/२०१८ इ. रोजी पासून म्हणजेच गेल्या ७ वर्षांहून अधिक काळ सलगपणे माझेशी अगर माझे पै-पाहूणे, मित्र मंडळी यांना एकदाही संपर्क साधलेला नाही व अन्य कोणाचाही त्यांच्याशी संपर्क झालेला नाही.

५) श्री.ऱामचंद्र राजाराम कुराडे हे आमचे रेंदाळ येथील राहते घरी परत आलेले नाहीत. पोलिसांनी देखील शोधाशोध करून श्री.ऱामचंद्र राजाराम कुराडे हे मिळून आलेले नाहीत अगर त्यांचा ठावठीकाणा लागलेला नाही. सदर श्री.ऱामचंद्र राजाराम कुराडे हे ता-०१/०२/२०१८ इ. ऱोजी पासून बेपत्ता आहेत. सबब नमुद कारणांमुळे मला प्रस्तुतचा दावा दाखल करणे भाग पडलेले आहे.

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.
Ichalkaranji

६) श्री.ऱामचंद्र राजाराम कुराडे हे ता-०१/०२/२०१८ इ. रोजी पासून माझेकडे परत आलेले नाहीत. अथवा मी, त्यांचाशोध घेवून देखील ते कोठेही मिळून आलेले नाहीत अगर त्यांचा गेले सात वर्षाहून अधिक काळ कोणाशीही संपर्क झालेला नाही. श्री.ऱामचंद्र राजाराम कुराडे यांचे पश्चात निरनिराळ्या शासकीय व निम शासकीय कार्यालयांत व कागदोपत्री श्री.ऱामचंद्र राजाराम कुराडे यांचे सरळ व कायदेशीर वारस म्हणून माझे व वादी क्र-२ ते ४ यांची नोंद होणे गरजेचे व आवश्यक आहे. मी, व वादी नं-२ ते ४ आम्हीच श्री.ऱामचंद्र राजाराम कुराडे यांचे सरळ व कायदेशीर वारस असून त्यांना अन्य कोणीही सरळ व कायदेशीर वारस नाहीत. तथापी श्री.ऱामचंद्र राजाराम कुराडे हे गेल्या ७ वर्षांहून अधिक काळ बेपत्ता असलेने त्यांचा दिवाणी मृत्यू झालेचे ठरवून मिळणेकरीता व श्री.ऱामचंद्र राजाराम कुराडे यांचे मी, व वादी नं-२ ते ४ आम्हीच सरळ व कायदेशीर वारस असलेचे ठरवून मिळणेकरीता मला प्रस्तुतचा दावा दाखल करणे भाग पडलेले आहे.

७) मी या कामी यादी नि- अ.क्र-२ ला दैनिक महानकार्य या वृत्तपत्रामध्ये ता- २४/०१/२०२६ इ. रोजी प्रसिद्ध केलेला जाहीरनामा हजर केलेला आहे. तसेच मी या कामी यादी नि- अ.क्र-३ ला दैनिक महानकार्य या वृत्तपत्रामध्ये ता- २४/०१/२०२६ इ. रोजी प्रसिद्ध केलेल्या जाहीरनाम्याचे बील हजर केलेले आहे. त्यावरती व्यवस्थापक दैनिक महानकार्य यांची सही व शिक्का आहे. त्यातील सर्व मजकूर खरा व बरोबर असून त्यास निशानी देणेत यावी.

८) **दाव्यास कारण-**

माझे पती व वादी नं-२ ते ४ यांचे वडील श्री.ऱामचंद्र राजाराम कुराडे हे ०१/०२/२०१८ इ. रोजी राहते घरातुन कोणास काहीही न सांगता निघून गेलेले आहेत. त्यावेळेस व मी, ता-२१/०४/२०१८इ. रोजी श्री.ऱामचंद्र राजाराम कुराडे ही व्यक्ती मिसिंग असलेबाबत तसा वर्दी जबाब नोंदविलेला आहे. पोलिसांनी देखील चौकशी,शोधाशोध करून श्री.ऱामचंद्र

27/1/26
Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.
Ichalkaranji

राजाराम कुराडे हे मिळून आलेले नाहीत अगर त्यांचा आजतागायत ठाव ठीकाणा लागलेला नाही. त्यावेळी व श्री.ऱामचंद्र राजाराम कुराडे यांचा गेले ७ वर्षांहून अधिक काळ कोणाशीही संपर्क झालेला नाही. त्यावेळी, त्यासुमारास व आजतागायत दावेस कारण घडलेले आहे.

**९) दावेचा तपशील-**

| **रुपये पैसे** | **तपशील** |
|---|---|
| र.रु-१.०००/-मी, | या कामी हक्कज्ञापणाची दाद मागितलेली असून त्याची आकारणी सदरी दाखल. |

**१०) दावेची आकारणी-**
दाव्याची आकारणी कोर्ट फ़ी करीता व ज्युरीसडीक्शन करीता र.रु-१.०००/- केली असून, त्यावर महाराष्ट्र कोर्ट फ़ी अधिनियम ॲक्ट १९५१ चे कलम ६(j) नुसार योग्य तो कोर्ट फ़ी स्टॅम्प जोडला आहे.

**११) अधिकारक्षेत्र-** माझे पती श्री.ऱामचंद्र राजाराम कुराडे हे रेंदाळ येथील त्यांचे राहत्या घरातुन निघून गेलेले आहेत. तसेच मी, देखील मे. कोर्टाचे स्थलसिमेत राहत असलेने सदरचा दावा चालवून निकाली काढणेचा अधिकार या मे. कोर्टास आहे.

१२) दावेतील मागणीसाठी मी अन्य कोणताही दावा दाखल केलेला नाही.

**१३) सबब माझी नम्र विनंती की,**

**अ)** मी, दाखल केलेला प्रस्तुतचा दावा मंजूर करणेत यावा.

**ब)** माझे पती व वादी नं-२ ते ४ यांचे वडील श्री. ऱामचंद्र राजाराम कुराडे यांचा दिवाणी मृत्यू झालेचे हक्कज्ञापन होवून मिळावे व तसा हुकुमनामा व्हावा.

27/4/26
Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.
Ichalkaranji

**क)** श्री. ऱामचंद्र राजाराम कुराडे यांना मी, व वादी नं-२ ते ४ हेच सरळ व कायदेशीर वारस असलेचे हक्कज्ञापन होवून मिळावे व तसा हुकुमनामा व्हावा.

**इ)** इतर न्यायाचे व समतेचे सर्व हुकूम आमचे बाजूने व्हावेत.

**ई)** जरूर तर दावा दुरुस्तीस परवानगी असावी.

वरील संपूर्ण मजकूर माझे माहीती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केले ॲफिडेव्हिट असे........

मी यातील वादी नं-१ यांना ओळखतो

Adv.
(ॲड.आर.एस.गळदगे)

SKurade
वादी

**- प्रतिज्ञा -**

मी यातील वादी नं-१ सौ.सुजाता रामचंद्र कुराडे व.व-४७, धंदा- घरकाम रा- बिरदेव नगर, रेंदाळ. ता-हातकणंगले, जि-कोल्हापुर. माझेसाठी व वादी नं-२ ते ४ यांचेसाठी सत्य प्रतिज्ञेवर कथन करते की, प्रस्तुत ॲफ़िडेव्हिट मधील सर्व मजकूर माझे माहीती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणूण केली प्रतिज्ञा आज मु ।

इचलकरंजी

ता- २७/०२/२०२६

SKurade
वादी

Solemnly Affirmed before me by Smt. Sujata Ramchandra Kurade, 47
of Rendal, Hatkanangale who is
identified by Shri. R.S. Galdage Adv
.............whom I know personally
Dated :-
27/2/26 27/2/26

Assistant Superintendent
Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.
Ichalkaranji